# अलगीकरण केंद्रांना अखंडित वीजपुरवठा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबईतील करोनाग्रस्तांची संख्या सातत्याने वाढती आहे. यासाठी प्रशासनाकडून अधिकाधिक अलगीकरण केंद्र उभे केले जात आहेत. त्यासाठी पाचशे खाटांची क्षमता असलेल्या नऊ रुग्णालयांना तसेच वर्सोवा मैदानावर महाराष्ट्र होमगार्ड्सनि बांधलेल्या पाचशे रुग्णांची क्षमता असलेल्या ३० हजार चौरस फूट जागेत विशेष केंद्र उभे केले जात आहे.

महापालिका प्रशासनाने दोन हजार ९५७ फ्लॅटमध्ये असे अलगीकरण कक्ष उभे केले आहे. त्या सर्वांना अखंडित वीजपुरवठा होत आहे. अशा विविध ठिकाणी सुरु केलेले अलगिकरण (क्वारंटाइन) केंद्रांमधील एक हजार खाटा व ३५०० फ्लॅट्सना अखंडित वीजपुरवठा सुरू करण्यात आला आहे. अदानी एनर्जी मुंबई लिमिटेडने (एईएमएल) यासाठी पुढाकार घेतला आहे.

● एईएमएलकडून मुंबई व उपनगरातील चारशे चौरस किलोमीटर भागात पसरलेल्या ३० लाखांहून अधिक ग्राहकांना वीजपुरवठा करते. ऊर्जा वितरण नेटवर्कच्या माध्यमातून दोन हजार मेगावॅट विजेचा पुरवठा होतो. या कक्षेत असलेल्या सर्व अलगीकरण केंद्रांना प्राधान्याने वीजपुरवठा करण्याचे काम एईएमएलने हाती घेतले आहे.



याबाबत एईएमएलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, ''अलगीकरणाच्या हेतूने प्रशासनाने आणखी ४५५ फ्लॅट्स निश्चित केले आहेत. तेथेही विद्युतीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. अदानी इलेक्ट्रिसिटीकडून पश्चिम व पूर्व भागात वीजपुरवठा केला जातो. त्या कक्षेत येणाऱ्या सर्व प्रभावित क्षेत्रांना एईएमएलने प्राधान्यतत्त्वावर अखंडित वीजपुरवठा सुरू केला आहे.

यामध्ये शिवाजीनगर येथील मॅटर्निटी केअर सेंटर, अंधेरीतील मुंबई महापालिका रुग्णालय आणि विलगीकरणाखाली असलेल्या अन्य काही निवासी भागांचा समावेश होतो. महापालिका, जिल्हाधिकारी, नागरी संरक्षण संचालनालय आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या (एसआरए) यांच्या सहकार्याने एईएमएलने शहरातील